# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

*(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६)व्दारा संचालित राज्य विद्यापीठ*

## विद्यापीठ विकास विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)

फोन:०७१३२-२१६५५४, २२३१०४ फॅक्स : ०७१३२-२२२६५१


जा.क्र. वि.वि.वि./गो.वि./ ४००४/२०१७ दिनांक : २८/१२/२०१७

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय– 'सोशल मिडीया मुळे युवकांच्या नितीमुल्यांमध्ये ऱ्हास होतो' या विषयावरील वादविवाद स्पर्धबाबत.

संदर्भ –मा.प्राचार्य एस.आर.एम. कॉलेज ऑफ सोशल वर्क चंद्रपुर यांचे पत्र क्र SRMCS/4/439/17 दि.१८/१२/२०१७.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की, एस.आर.एम. कॉलेज ऑफ सोशल वर्क चंद्रपुर च्या वतीने सर्वोदय शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव माजी प्राचार्य,महाराष्ट्र राज्य आर्दश शिक्षक पुरस्कार प्राप्त स्व.के.उ.निंबाळकर उपाख्य बाबासाहेब निंबाळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ **"सोशल मिडीया मुळे युवकांच्या नितीमुल्यांमध्ये ऱ्हास होतो"**. या विषयावर विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा **दिनांक २९ डिसेंबर २०१७ ला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयात आयोजीत केलेले आहे.** सदर वादविवाद स्पर्धेत सहभागी व उपस्थित राहण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवगत करावे, ही विनंती.

सधन्यवाद.

**सहपत्र**:– सदर्भीय पत्र.

उपकुलसचिव(प्र)
विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

उपकुलसचिव
विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सर्वोदय शिक्षण मंडळ संचालित

# सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, चंद्रपूर

डॉ. सुनील एम. साकुरे
प्राचार्य
M.S.W., M.Phil., Ph.D.
(R) : (07172) 251266

Post Box No. 20
नागपूर रोड, पडोली, चंद्रपूर
जि. चंद्रपूर – ४४२ ४०६ (महा.)
☎ : (07172) 230337
Web : www.srmcollege.ac.in
email : spcsw1988@yahoo.co.in

( NAAC Accredited 'B' Grade with (CGPA 2.55 )

पत्र क्र. : SRMCSW/439/17 दिनांक : 18/12/2017

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 12260 दि. 19/12/17
जावक 12260 दि. 19/12/17

प्रति,

मा. कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेकरीता विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करुन सहकार्य करण्याबाबत

महोदय,

सविनय विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, पडोली, चंद्रपूर च्या वतीने मागील २८ वर्षापासून सुदृढ समाज घडविण्याकरीता विविध कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. देशात होणाऱ्या विविध सामाजिक घटना, धोरणात होणारे बदल याविषयी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मत जाणून घेण्याकरीता शैक्षणिक सत्र २०१७–२०१८ मध्ये सर्वोदय शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव, माजी प्राचार्य, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त **स्व. के. उ. निंबाळकर उपाख्य बाबासाहेब निंबाळकर** यांच्या स्मृती प्रीत्यर्थ **विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन "सोशल मिडीया मुळे युवकांच्या नितीमुल्यांमध्ये ऱ्हास होतो"** या विषयावर वादविवाद स्पर्धा दिनांक २९ डिसेंबर २०१७ ला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरविलेले आहे. तरी स्पर्धा घेण्याकरीता सहकार्य करुन सोबत **जोडलेले स्पर्धेसंबधी नियम व पारितोषिकाचे स्वरुप गोंडवाना विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे** जेणेकरुन ग्रामीण व शहरी भागात कार्यरत असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होवून आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल.

धन्यवाद.

आपला

प्राचार्य
एस.आर.एम. कॉलेज ऑफ सोशल वर्क
पडोली, चंद्रपूर

सहपत्र :– स्पर्धेचे नियम व अटी प्रपत्र सोबत जोडलेले आहे.

# सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, पडोली, चंद्रपूर

सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूरचे संस्थापक सचिव, माजी प्राचार्य, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त **स्व. के. उ. निंबाळकर उपाख्य बाबासाहेब निंबाळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन** वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**विषय** :– **''सोशल मिडीया मुळे युवकांच्या नितीमुल्यांमध्ये ऱ्हास होतो''**

**स्पर्धा दिनांक** :– २९ डिसेंबर २०१७

**वेळ** :– सकाळी ११.०० वाजता

**स्थळ** :– सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, पडोली, चंद्रपूर.

**स्पर्धेचे नियम** :–

१) प्रत्येक महाविद्यालयातून दोन स्पर्धक स्पर्धेत भाग घेऊ शकतील.
२) एक विषयाचे बाजुने व दुसरा विषयाच्या विरुध्द बाजुने बोलने अनिवार्य राहिल.
३) स्पर्धकाला आपले विचार मांडण्याकरीता ५+२=७ मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
४) स्पर्धकाला मराठी, हिंदी व इंग्रजी या कोणत्याही एका भाषेत आपले विचार मांडता येईल.
५) प्रथम विषयाच्या बाजुने व विरुध्द बाजुने विचार मांडणाऱ्यांना सर्व स्पर्धक संपल्यावर २ मिनीटाचा कालावधी खंडणाकरीता देण्यात येईल.
६) स्पर्धेत सहभागी होण्याकरीता स्पर्धकाला महाविद्यालयाचे परवानगीपत्र व ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

**स्पर्धा पारितोषीकाचे स्वरुप** :–

१) वादविवाद स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना महाविद्यालयाकडून प्रमाणपत्र देण्यात येईल.
२) प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाला रोख रक्कम रु. २,५०१/– देण्यात येईल.
३) द्विातीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाला रोख रक्कम रु. १,५०१/– देण्यात येईल.
४) तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाला रोख रक्कम रु. १,००१/– देण्यात येईल.
५) सांघीक प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या चमुला फिरते ढाल देण्यात येईल.
६) व्यक्तीगत पारीतोषीक पटकाविणाऱ्या स्पर्धकाला प्रा. डॉ. संजिव के. निंबाळकर यांचे कडून स्मृतीचिन्ह देण्यात येईल.

टिप :–

१) महाविद्यालयांनी वादविवाद स्पर्धेतील आपले प्रवेश दि. २६ डिसेंबर.२०१७ पर्यंत निश्चित करावे.
२) अधिक माहितीकरीता संपर्क :– अ) प्रा. विश्वनाथ राठोड – ९८५०१८३६६४
ब) प्रा. डॉ. ममता ठाकुरवार – ९०११३७८४२९